**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४०/२०२६.**
**निशाणी क्र.०५ पुढे**
**CNR No.– MHWR-050000722026**
**शासन विरुध्द शितल काळे**

## न्यायनिर्णय

(दिनांक ०४.०७.२०२६)

अभियोगपक्षाची खटल्यातील कथने विचारात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावर कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दिनांक ०९.०१.२०२६ रोजी, ०६.५० ते ०७.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी ही मौजे शिवणी पारधी बेडा, समुद्रपूर ता. समुद्रपूर, जि. वर्धा येथील तिच्या घराच्या पाठिमागे एका लोखंडी ड्रममध्ये अंदाजे १५० लिटर सडवा रसायन, २८ प्लास्टीक ड्रममध्ये २८०० लिटर व ५ लोंखडी ड्रममध्ये १,००० लिटर कच्चा मोहा सडवा रसायन, ३ प्लास्टीक कॅनमध्ये ९० लिटर गावठी मोहा दारुची विनापरवाना बेकायदेशीररित्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगून होती, म्हणून तिने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (बी), (सी), (ई) आणि (एफ) प्रमाणे गुन्हा केला? | .....नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

# <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ करीता –</u>**

२. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द केस शाबीत करण्या पृष्टयर्थ विठ्ठल ठाकरे, अ.सा.क्र ०१ व शेख रफीक शेख कादर अ. सा.क्र .०२ यास तपासले आहेत. सदर साक्षीदार हे जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून ते अभियोगपक्षाच्या कथनास पुष्टी देत नाहीत. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारांना सुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षास मदत होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, जप्ती पंचनामा व त्यातील मजकूर शाबीत झालेला नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद व त्यातील मजकूर शाबीत झालेला नाही. अभियोगपक्षाच्या कथनास पुष्टी देणा–या स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, प्रस्तुत प्रकरणी सी.ए. अहवाल दाखल नाही.

३. तथापि, आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, फिर्याद, जप्ती पंचनामा व त्यातील मजकूर शाबीत न झाल्यामुळे आरोपी ही दिनांक ०९.०१.२०२६ रोजी, ०६.५० ते ०७.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी ही मौजे शिवणी पारधी बेडा, समुद्रपूर ता. समुद्रपूर, जि. वर्धा येथील तिच्या घराच्या पाठिमागे एका लोखंडी ड्रममध्ये अंदाजे १५० लिटर सडवा रसायन, २८ प्लास्टीक ड्रममध्ये २८०० लिटर व ५ लोंखडी ड्रममध्ये १,००० लिटर कच्चा मोहा सडवा रसायन, ३ प्लास्टीक कॅनमध्ये ९० लिटर मोहा दारुची विनापरवाना बेकायदेशीररित्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगून होती, असे गृहीत धरता येणार नाही, म्हणून मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत**

४. मुद्दा क्र. १ चा नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता संशयाचा फायदा आरोपीला देऊन तिस दोषमुक्त करणे न्यायोचित होणार आहे, म्हणुन मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१) आरोपी शितल अजय काळे, वय –३० वर्षे, व्यवसाय– मजुरी, रा. शिवणी पारधी बेडा ता. समुद्रपूर, जि. वर्धा, हिस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९, चे ६५ (बी), (सी), (ई) आणि (एफ) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे अपीलीय न्यायालयात हजर राहण्याकरिता रक्कम रुपये ५०,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र या न्यायालयात सादर करावे.

(प्रस्तुत न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PATIL PRAKASH LALASAHEB

Digitally signed by PATIL PRAKASH LALASAHEB
Date: 2026.07.04 15:42:27 +0530

ठिकाण – समुद्रपूर. ( पी. एल. पाटील )

दिनांक –०४.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, समुद्रपूर.

CERTIFICATE

Certified that PDF copy of judgment is word to word identification to the original order.

(A. A. More)
Stenographer Gr-III